# आविष्कार शिक्षण संस्था, नशिक

अर्थपूर्ण आनंददायी शिक्षण
आविष्कार शिक्षणसंस्था संचलित

रजि. नं. महा/५६७६/९८/ना F - ५४०३

सुशिला-कृष्ण, पी ॲंड टी कॉलनी, शरणपूर रस्ता, नाशिक ४२२००५ फोनः ९४२१५०७५६४ / ९४२१५०७७८२

E-mail: avishkar_nsk@rediffmail.com http : www.anandniketan.ac.in

दिनांक :

महोदय,

सप्रेम नमस्कार

एका चांगल्या शैक्षणिक चळवळीची माहिती देण्यासाठी व सहभागाची विनंती करण्यासाठी हे पत्र. वय वर्ष ३ ते १५ हा मुलांच्या जीवनातील फुलण्याचा कालखंड आहे. स्वतःला व परिसराला जाणून घेण्याचा, क्षमतांच्या विकासाचा व त्या अनुरूप स्थान मिळविण्याच्या धडपडीच्या पायाभरणीचा हा काळ. दुदैवाने आज हे फुलणे फारसे आनंददायी होत नाही. कारण शिक्षण हे क्षमतांच्या विकासापेक्षा स्पर्धेची तयारी म्हणून दिले जाते. यातून मुलांची सुटका व्हावी, शिक्षण अर्थपूर्ण, आनंददायी व सहभागशील व्हावे या हेतुने नाशिकमध्ये आविष्कार शिक्षण संस्थेच्या वतीने गेल्या अकरा वर्षापासून '**आनंद निकेतन** ' ही प्रयोगशील शाळा चालविण्यात येत आहे.

शिक्षण हे जीवनदायी असले पाहिजे. शिक्षणाने मुलांच्या व्यक्तिमत्व विकासाबरोबरच सामाजिक विकास होऊन एक जबाबदार नागरिक तयार व्हावा असे आम्हांला वाटते. त्यासाठी आम्ही अनेक उपक्रम राबवित असतो.

**शाळेची प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.**

१. योग्य आकलन व अभिव्यक्तीसाठी मराठी माध्यम.

२. मर्यादित विद्यार्थी संख्येमुळे विद्यार्थी व शिक्षिका यात जिव्हाळ्याचे नाते.

३. निरीक्षण, अनुभव व प्रत्यक्ष सहभागातून शिक्षण.

४. पुस्तकी शिक्षणापेक्षा शिक्षण जीवनाशी जोडण्यासाठी विविध उपक्रम.

५. उद्योजकतेचा दृष्टिकोन विकसित करण्यासाठी पाचवी पासून विशेष प्रशिक्षण.

६. समाजातील सर्व वर्गातील मुलांना या सहभागशील, प्रयोगशील शिक्षणाची संधी मिळावी यासाठी माफक फी आकारणी.

७. इंग्रजी भाषेच्या विकासासाठी डॉ. मीनल परांजपे (मुंबई) यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष प्रयत्न. गणित विषयाकरिता नवनिर्मिती (मुंबई) व विज्ञानासाठी डॉ. होमी भाभा सायन्स सेंटरचे मार्गदर्शन व प्रशिक्षण.

८. सामाजिक जाणीव जागृतीसाठी सुनियोजित कार्यक्रम.

९. शैक्षणिक विकासाइतकेच भावनिक विकासाकडे लक्ष.

१०. सुजाण पालकत्त्वासाठी पालकसभा, कार्यशाळा.

पूर्वी शाळा या समाजातील सर्व घटकांना एकत्र आणून त्यांच्यात सदभाव निर्माण करण्याची जागा होती. कृष्ण आणि सुदामा एकाच आश्रमात राहिले व शिकले. म्हणून पुढे कृष्णाला सुदाम्याचे दु:ख समजू शकले. पण आता समाजातील सर्व वर्ग व जाती यांची शिकण्याची ठिकाणे भिन्न झाली आहेत. ही स्थिती अत्यंत घातक आहे. यामुळेच आनंद निकेतन सर्व घटकांना एकत्र आणण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करीत असते. यासाठी प्रत्येक वर्गात अल्प उत्पन्न गटातील काही मुलांना प्रवेश दिला जातो. मात्र शाळेला कोणतेही अनुदान नसल्यामुळे या मुलांची फी व इतर खर्च समाजातील चांगल्या आर्थिक गटातील व्यक्तींनी करावा अशी अपेक्षा आहे.

यावर्षी आमच्या शाळेत अशी १६ मुले आहेत. त्यांचा वार्षिक खर्च प्रत्येकी ५००० रु. इतका आहे. अशा कामांमध्ये तुम्हाला रस असेल व अशा प्रकल्पांना तुम्ही सहाय्य कराल असा विश्वास वाटतो. सोबत आपल्या माहितीसाठी मुलांची यादी जोडली आहे. त्यातील कोणाचाही या वर्षीचा खर्च तुम्ही देऊ शकता. त्यांच्या इ.१० पर्यंतच्या खर्चाची जबाबदारी घेतली तर फारच चांगली गोष्ट होईल.

आपण आमच्या शाळेला आवश्य भेट द्यावी.

**अधिक माहितीसाठी आमच्या वेबसाईटला भेट द्या :** www.anandniketan.ac.in
**संपर्कासाठी आमचा ई-मेल :** avishkar_nsk@rediffmail.com

आपल्या सहकार्याच्या व प्रतिसादाच्या अपेक्षेत.

आपला/आपली

आविष्कार शिक्षण संस्था, नाशिक करिता.

**आनंदनिकेतन शाळेमधील फी न भरू शकणा-या आर्थिकदुर्बळ गटातील मुलांची यादी.**

1. **सैय्यद अलमास अजिज** इयत्ता १ ली
   घरची परिस्थिती - आई धुणीभांडीची कामे करते. वडीलांचे दर्ग्याजवळ फुलांचे दुकान.
   ती बालवाडीपासून या शाळेत येते.
   तिची शाळेतील एकंदर प्रगती बरी आहे.

2. **कुंभारे प्रेरणा जनार्दन** इयत्ता २ री
   घरची परिस्थिती - आई घरकाम करते. वडील कंपनीत काम करतात.
   ती इयत्ता १ लीपासनू या शाळेत येते.
   तिची शाळेतील एकंदर प्रगती चांगली आहे.

3. **भोडंवे अजय संजय** इयत्ता २ री
   घरची परिस्थिती - आई धुणीभांडीची कामे करते वडील मजुरी करतात.
   तो इयत्ता १ लीपासनू या शाळेत येतो.
   त्याची शाळेतील एकंदर प्रगती बरी आहे.

4. **गिराम नवनाथ सखाराम** इयत्ता ३ री
   घरची परिस्थिती - आई घरकाम करते. वडील वायरमन आहेत.
   तो बालवाडीपासून या शाळेत येतो.
   त्याची शाळेतील एकंदर प्रगती ठीक आहे.

5. **लहांगे श्वेता रतन** इयत्ता ३ री
   घरची परिस्थिती - आई घरकाम करते. वडील कंपनीत काम करतात.
   ती बालवाडीपासून या शाळेत येते.
   तिची शाळेतील एकंदर प्रगती बरी आहे.

6. **मोरे रणजीत गोपीचंद** इयत्ता ३ री
   घरची परिस्थिती - आई शिवणकाम करते. वडील सेन्टरिंगच्या काममध्ये मजुरी
   तो इयत्ता २ रीपासून या शाळेत येतो.
   त्याची शाळेतील एकंदर प्रगती बरी आहे.

7. **गिराम रोहिणी सोमश्वर** इयत्ता ४ थी
   घरची परिस्थिती - आई घरकाम करते. वडील वायरमन आहेत.
   ती इयत्ता १ लीपासनू या शाळेत येते.
   तिची शाळेतील एकंदर प्रगती चांगली आहे.

8. **साळवे अमोल आनंदा** इयत्ता ४ थी
   घरची परिस्थिती - आई घरकाम करते. वडील वॉचमन आहेत.
   तो इयत्ता ४ थीपासनू या शाळेत येतो.
   त्याची शाळेतील एकंदर प्रगती बरी आहे.

9. **खैरनार पलकेश भारत** इयत्ता ४ थी
घरची परिस्थिती - आई आनंदनिकेतनमध्ये काम करते. वडील वॉचमन आहेत. वडील
तो बालवाडीपासून या शाळेत येतो.
त्याची शाळेतील एकंदर प्रगती बरी आहे.

10. **पोटिंदे कृष्णा रामचंद्र** इयत्ता ५ वी
घरची परिस्थिती - आई धुणीभांडीची कामे करते. वडील बिगारी काम करतात.
तो इयत्ता ३ रीपासनू या शाळेत येतो.
त्याची शाळेतील एकंदर प्रगती बरी आहे.

11. **साळवे रामेश्वर आनंदा** इयत्ता ५ वी
घरची परिस्थिती - आई घरकाम करते. वडील वॉचमन आहेत.
तो इयत्ता ५ वीपासून या शाळेत येतो.
त्याची शाळेतील एकंदर प्रगती बरी आहे.

12. **कांबळे पल्लवी विजय** इयत्ता ६ वी.
घरची परिस्थिती - आई धुणीभांडीचे काम करते वडीलांची चहाची टपरी आहे.
ती इयत्ता १ लीपासून या शाळेत येते.
तिची शाळेतील एकंदर प्रगती बरी आहे.

13. **खान फैज आरिफ** इयत्ता ६ वी.
घरची परिस्थिती - आई घरकाम करते. वडील गवंडी काम करतात.
तो इयत्ता १ लीपासून या शाळेत येतो.
त्याची शाळेतील एकंदर प्रगती चांगली आहे.

14. **साबळे जीवन दत्तू** इयत्ता ६ वी
घरची परिस्थिती - आई घरकाम करते. वडीलरिक्षा चालवतात.
तो इयत्ता १ लीपासून या शाळेत येतो.
त्याची शाळेतील एकंदर प्रगती ठीक आहे.

15. **भोसले अक्षय वसंत** इयत्ता ७ वी.
घरची परिस्थिती - आई शिवणकाम करते. वडील ड्रायव्हर आहेत.
तो इयत्ता १ लीपासून शाळेत या येतो.
त्याची शाळेतील एकंदर प्रगती ठीक आहे.

16. **खैरनार अक्षय भारत** इयत्ता ७ वी
घरची परिस्थिती - आई आनंदनिकेतनमध्ये काम करते. वडील वॉचमन आहेत.
तो इयत्ता १ लीपासनू या शाळेत येतो.
त्याची शाळेतील एकंदर प्रगती बरी आहे.